**औंदुबर कडलासकर वगैरे वि.**
**अर्जुन श्रीमंत कडलासकर वगैरे**

**आदेश निशाणी क्रमांक २७ वर**

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादींनी प्रतिवादी क्र. १ चे वारसांना रेकॉर्डवर घेणेसाठी व त्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात दुरूस्ती करणेची मागणी केली आहे.

२. वादीच्या मते, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ अर्जुन श्रीमंत कडलासकर हे दिनांक २९.०३.२०२२ रोजी मयत झाले आहे. त्यांना विधवा पत्नी, दोन मुले, व दोन मुली असे वारस आहेत. सदर वारसांना रेकॉर्डवर आणणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहेत. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. १ च्या नावापुढे "मयत वारस" असे लिहून अर्जात दिल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १अ ते १इ असे दुरूस्तीने लिहिण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर मयत प्रतिवादी क्र. १ च्या वारसांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, सदरचे वारस मुदतीत रेकॉर्डवर नाहीत व विलंब माफ झालेला नाही. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. यातील वादींनी निशाणी क्र.३० सोबत प्रतिवादी क्र. १ च्या मृत्यूप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. तसेच त्यात प्रतिवादी क्र. १ अर्जुन श्रीमंत कडलास्कर यांची मृत्यूतारीख २९/०३/२०२२ अशी नमूद आहे. प्रतिवादी क्र. १ यांना अर्जात नमूद वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादी क्र. १ याने आपले प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २८ सोबत अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील मागणीप्रमाणे दुरूस्ती करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही. तसेच, दाव्याचा निकाल

गुणवत्तेवर लागणेसाठी प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादी यांनी दाव्याच्या सरनाम्यामध्ये अर्जाप्रमाणे दुरूस्ती करणेची आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती १४ दिवसांमध्ये करणेची आहे व त्याची दुरूस्त प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल करणेची आहे.

६. प्रस्तुतच्या अर्जाचा व दुरूस्तीचा खर्च वादींनी सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- १८/०४/२०२३ श्रीमती एस. ए. साळुंखे

ठिकाण- पंढरपूर पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 20.04.2023 |